सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत अंतर्गत राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणा-या Population Based Screening (PBS) या उपक्रमांतर्गत उपकरणे व साहित्य सामुग्री खरेदीस प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-२०१७/प्र.क्र.६०३/आरोग्य -७

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : २४ जानेवारी, २०१८.

वाचा :-१)सन २०१७-१८ आर्थिक वर्षाचा राष्ट्रीय असंसर्गजन्यरोग नियंत्रण कार्यक्रमाचा मंजूर कृति आराखडा.

२) सहसंचालक (असंसर्गजन्यरोग),आरोग्य सेवा,मुंबई.यांचे पत्र क्र.संआसे/NCD/उपकरणे व साहीत्यसामुग्री/खरेदी/प्रशासकीय मान्यता/४५१७-१८,दिनांक ०५/१२/२०१७

प्रस्तावना :-

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत येणाऱ्या NPCDCS कार्यक्रमांतर्गत वर्धा, भंडारा, सातारा व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमधील १० उपकेंद्रांमध्ये Population based Screening (PBS) हा उपक्रम प्रायोगिक तत्वावर माहे डिसेंबर, २०१६ पासून सुरु करण्यात आला आहे.तसेच, जिल्हा चंद्रपूर येथे सदर उपक्रम हा Public Private partnership (PPP) mode द्वारे अंबुजा सिमेंट या कंपनीमार्फत सीएसआर अंतर्गत तीन प्राथमिक केंद्रांमध्ये व त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामध्ये प्रायोगिक तत्वावर सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात राबविण्यात येणार आहे. तसेच, पुणे जिल्हयामध्ये सदर उपक्रम हा NPCDCS कार्यक्रमांतर्गत दोन Block मधील येणारे उपकेंद्रामध्ये प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येणार आहे.

२. प्रस्तुत कार्यक्रमांतर्गत उपरोक्त जिल्ह्यांमधील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र स्तरावर

३० वर्षावरील व्यक्तिंची मधुमेह, उच्च रक्तदाब आणि तीन सर्वसामान्य जसे की मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग, गर्भाशय पिशवी कर्करोग यांची तपासणी करण्यात येणार आहे. सदर तपासणी करण्याकरीता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार उपकरणे व साहित्य सामुग्रीची आवश्यकता असल्याने सदर उपकरणे व साहित्य सामुग्री खरेदी करण्यास शासनाची प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत अंतर्गत राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणा-या Population Based Screening (PBS) या उपक्रमांतर्गत उपकरणे व साहित्य सामुग्री खरेदी करण्यासाठी अंदाजीत रु.४३४.८९ लक्ष (रुपये चार कोटी चौतीस लक्ष एकोणनव्वद हजार फक्त) खर्चास तसेच सदर खरेदी करण्यात येणा-या साहित्यसामुग्रीचा पुरवठा हा वरील जिल्हयांना टप्प्या-टप्प्याने करण्यास (Staggered)प्रशासकीय मान्यता देण्यात आहे.

२. सदर उपकरणे व साहित्य सामुग्रीबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

Table no.1 - Equipment

Sr. No.	Item		Specification	Actual Demand received from district	Actual Supply to be given	Unit cost	Required budget in lakhs
	Digital BP Apparatus	1	Fully Automatic inflation and deflation	1275	1275	1000	1275000
		2	Hypertension indicator (Above 140 Systolic/ 90 diastolic)				
		3	Memory for at least 5 sets of last readings				
		4	Display Digital Machine should be portable				
		5	BP Measurement Range - (0-299) mm of Hg				
		6	Pulse recorder - 40 - 180 beats / min				
		7	Accuracy : Pressure + 4mm of Hg				
			pulse reading + 5 % of reading				
		8	Inflation : Electric Pump				
		9	Deflation : Automatic pressure relax value				
		10	Power Supply : 4 AA Battery 1.5 V (Rechargeable batteries + charger)				
		11	Battery life : Approximately 300 measurements				
		12	Operating Temperature - 10 to 40 degree Celsius				
		13	Cuff Material : (Double Stiched) Nylon or Ploystet				
		14	Medium Size cuff Qty - 02 Nos, Large Size cuff Qty-01 No. with arterial indicator				
		15	2 years Manufacturer warranty				
		16	Laminated pictorial user Manual				
		17	ISO Certificated				

	Cusco's Speculum	1	Typical Size (Medium) - 80 mm in length x 22 mm in Width	13415	9743	300	2922900
		2	Double beaked with blunt lip				
		3	Made up of Stainless Steel (SS304)				
		4	Model should have lateral screw				
			The blades of the Cusco's Speculum should be self-retaining speculum. Whose blades can be opered, closed and adjusted with attached screw.				
		5	Should be of Standard quality preferably ISO/ ISI certified				
	Examination Lamp	1	Portable , easy to move	1248	934	10000	9340000
		2	360 degree rotation of dome				
		3	Cool light				
		4	Articulated spring loaded arm with on/off switch and incorporated electronic transformer				
		5	Length of arm 85 cm				
		6	Voltage: 230 V				
		7	Bulb 12V 50W				
		8	Dome : Double wall light head construction to minimize heat				
		9	Base: chrome plated				
	Autoclave	1	Steam sterilizer (Autoclave, pressure cooker)	866	866	8000	6928000
		2	General purpose model, 304 grade SS.				
		3	Designed to operate at 121□ C,				
		4	Capacity - 12-151				
		5	Portable , heat -resistant handles,				
		6	Lid with seal (gasket), Pressure valve, safety valve				
		7	Heating :- electric heating				
		8	Power :- 230 vac, 50hz				
		9	Accessories: multilingual operating instructions, carrying bag				
		10	Spare: Rubber seals (gasket) - 3 nos				
			Safety valves - 2 nos				
			Valves for washers- 6 nos				
	Mouth Mirror with Handle		(Autoclavable, Removable Top No.5, Exact Sharpness and high contrast reflection, no double image, front surface coated, scratch resistant, rust free, Nonreflecting Stainless steel	28996	16888	180	3039840
							23505740

Table no.2 - Consumables

Sr. No.	Item Name	Specification	Actual Supply to be given	Unit cost	Required budget in lakhs
1	GLACIAL ACETIC ACID 5%	(1 Litre bottle)	3890	200	778000
2	DISTILLED WATER	(5 Litre Can)	14908	600	8944800
3	COTTON ROLL	(500 mg roll)	7453	300	2235900
4	GLOVES	100pc/ box Number 7	40124	200	8024800
Total					19983500

३. उपरोक्त प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

१) सदर औषधी व साहित्य सामुग्रीची आवश्यकता / मागणी याची शहानिशा / खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

२) सदरहू औषधी व साहित्य सामुग्रीचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती / अधिकारी) यांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसार असावेत. तसेच, सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच याबाबींची खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतूदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती दर निश्चित करण्यात यावा. सदर दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व / पुरवठानंतर नमुना तपासणी (pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश (specification) असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच, पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदरहू खरेदीसाठी होणारा खर्च FMR Code B.18.2 Universal Health Checkup & Screening of NCDs या घटकांतर्गत उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

८) तसेच, या बाबींच्या खरेदी द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

९) संपूर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रिय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/भाग-२/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अ.क्र.४ नियम क्र.७ समोरील स्तंभ क्र.६ येथील अटींची पूर्तता करण्यात यावी.

११) खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.

१२) परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद करण्यात आलेली उपकरणे कोणत्या औषध कंपनीकडून खरेदी करण्यात आली,तसेच कोणत्या जिल्हयांना किती उपकरणे पुरवठा करण्यात आली,याची सविस्तर माहीती शासनास एकत्रितरित्या कळवावी.

४. उपरोक्त अनुक्रमांक १ ते १२ येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची व खरेदी नियमानुसार व आवश्यकते प्रमाणे आहे हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, संचालक, आरोग्य सेवा संचालनालय व कार्यक्रम प्रमुख यांची राहील.

५. प्रस्तुतचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-पहिला उपविभाग-दोन मधील अनु क्रमांक ४, नियम क्र. ७ अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारामध्ये निर्गमित करण्यात येत आहेत.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०१२४१०४७५३३६१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Amol Nilakanth Sakharkar
Date: 2018.01.24 11:35:03 +05'30'

(अ. नि. साखरकर)

अवर सचिव

प्रति:-

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

प्रत,

१) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई.

२) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.

३) सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)

४) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.

५) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.

६) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)

७) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)

८) निवडनस्ती (आरोग्य-७)